# जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

Email ID- rdcparbhani@gmail.com Ph. No. 02452-223702

जा.क्र.2017/आरबी/डेस्क/पाटं/टॅंकर/निविदा क्र.1 दिनांक 19/01/2018

## खाजगी टॅंकर्ससाठी ई-निविदा सूचना (2017-18)

## (तृतीय मागणी)

परभणी जिल्हयासाठी पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजने अंतर्गत गावे, वाड्या, तांडे आणि नगरपालिका क्षेत्रात टंचाईच्या तिव्रतेनुसार खाजगी टॅंकर्स/ट्रक्स (पाण्याची टाकी बसविलेले) भाड्याने घेण्याची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. त्यासाठी या कार्यालयाचे जा.क्र.2017/आरबी/डेस्क/पाटं/टॅंकर/निविदा क्र.1, दिनांक 22/12/2017 अन्वये ई-निविदेची जाहिर सूचना प्रसिध्द करुन दिनांक 8/1/2018 रोजी पर्यंत टॅंकर्स व ट्रक्स (पाण्याची टाकी बसविलेले) द्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी अनुभवी व सक्षम कंत्राटदाराकडून ई-निविदा मागविण्यात आले होते. परंतू ई-निविदा प्रणाली अंतर्गत तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे ई-विविदेची द्वितीय मागणीची जाहिर सूचना दिनांक 9/1/2018 रोजी प्रसिध्द करुन दिनांक 18/1/2018 रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देऊन ई-निविदा मागविण्यात आले होते. परंतू प्रथम मुदतवाढी नंतरही ई-निविदा प्रणाली अंतर्गत तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी निविदेत भाग घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे.

सबब, उक्त ई-निविदेतील सूचना आणि "अटी व शर्ती" कायम ठेऊन ई-निविदेस 7 दिवसांची पुन्हा मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार इच्छुक कंत्राटदारानी ई-निविदा www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करावयात. त्याचा तपशिल खालील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा विक्री/डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.30/1/2018 रोजी 17:00 वाजेपर्यंत |
| 2 | ई-निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दि.30/1/2018 रोजी 17:00 वाजेपर्यंत |
| 3 | ई-निविदा (लिफाफा क्र.1) उघडण्याची संभाव्य दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक 1/2/2018 रोजी दुपारी 03:00 वाजता ठिकाण - जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी |
| 4 | ई-निविदा (लिफाफा क्र.2) उघडण्याची संभाव्य दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक 5/2//2018 रोजी सकाळी 11:00 वाजता ठिकाण - जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी |

ज्या निविदाधारकाने पुर्वी निविदा भरलेली असेल, त्यांना पुन्हा निविदा भरण्याची आवश्यकता नसुन त्यांना भरलेले दर सुधारण्याची मुभा राहील. सदरील ई-निविदा, निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील.

निविदेसंबंधी उपरोक्त तारखांमध्ये फेरबदल झाल्यास त्याची सुचना http://parbhani.nic.in व www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल, व्यक्तिगत सुचना देण्यात येणार नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

जिल्हाधिकारी, परभणी